# राशिभविष्य - एप्रिल , २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=======================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. कारण रवि, शनि, राहू व मंगळ हे ग्रह सर्व प्रकारचे आरोग्य व वैवाहिक जीवनाचे दृष्टीने प्रतिकुल असणार आहेत. काही कारणाने चिंताग्रस्त मन अस्वस्थ राहील. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. नियोजित कार्यात अडथळे येणे, अनाठाई खर्च होणे अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर सतत संयम व सहनशीलतेचे आचरण करणेच योग्य होईल. काही मंडळीना उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे असे आजार होण्याची शक्यता जाणवते. काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. काहीना चोरीमुळे अर्थहानी झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागेल; तर काही मंडळीना कुसंगतीचा परिणाम भोगावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. नोकरदार मंडळीना काळ प्रतिकुल होईल. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते यांना काळ अनुकुल होईल अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगजान नाची उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय लहरी व विक्षिप्त होण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे अनुकुल काळ गमावला जाणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे जे काय साधावयाचे ते

महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात मनाविरुद्ध सर्व काही घडत असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. जपा. मित्रांशी भांडणे टाळा. गुरू-शुक्राच्या शुभ योगात आणि महिन्याच्या अखेरच्या चार दिवसांत शुक्र लाभस्थानी गेल्यावर अनपेक्षित अर्थलाभ होण्याची शक्यता आहे. मानसोपचार तज्न्य व द्रव पदार्थाचे व्यापारी यांनाच केवळ काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतर व्यावसायिकांना अस्थिर परिस्थितीलाच तोंड द्यावे लागेल. ज्या मंडळीचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असेल अशांना काळ लाभदायक होईल. संततीसुखाचे दृष्टीने काळ तापदायक जाण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. श्र द्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने विष्णुसहस्रनाम पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. विशेष करून उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळीना काळ अधिक प्रगति कारक व लाभदायक होईल. तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना, वकिली, अकौन्टन्सी व्यवसाय व यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ ठीक जाईल. पण कला क्षेत्रातील मंडळीना महिन्याचा अखेरचा सप्ताह प्रतिकुल जाण्याची शक्यता आहे. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे अध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरुकृपेने आरोग्य चांगले राहील; पण घरगुती जीवनात गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची समस्या किंवा स्थावर संबंधी वाद अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. आळस, निरुत्साह, अनारोग्य अशापैकी कारणानी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या

शिक्षणात अडथळे येणे संभवते. जपा. वैवाहिक जीवनात सुख समाधान लाभेल. श्रद्धा असेल तर कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्णकाळ कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल, असे वाटते. गैरसमज, अपेक्षाभंग , स्थावर संबंधी वाद, मातेस त्रास , मातेशी न पटणे अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल व नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर कौटुंबिक सुख व मनस्वास्थ्य लाभेल. पूर्वार्धात नवीन काही करण्या चा प्रयत्नही करू नका. महिन्याच्या उत्तरार्धात मोठ्या लोकांच्या ओळखीने काही लाभदायक घटना घडतील, अशी शक्यता दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. जन्मकुंडलीत योग असेल तर शुक्राच्या अनुकुलतेने काहीना धनलाभ, काहीना भूमिलाभ तर काहीना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक असा सिद्ध होईल. दूरच्या वा परदेश प्रवासाचे योग संभवतात. पण जलप्रवास करू नका. जलभय आहे. तसेच विषभयही संभवते. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासानेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच समाजकार्याची आवड असणाराना हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. श्रद्धेने बावन्न श्लोकीगुरुचरित्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनारोग्य व आर्थिक चिंता त्रस्त करतील असे वाटते. शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. घसा, मान, दाढा दुखणे, डोळे तळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या त्रस्त करतील. त्यासाठी खूप धडपड करावी लागेल. गुरू-शनी शुभ योगामुळे दिलासा मिळेल. या राशीच्या काही मंडळीना उत्तम नोकरी वा नवे

ाकार्यक्षेत्मिळू ्शकेल वकिली, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्र ाहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण वैवाहिक जीवनात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना निराशा, मानहानी, पद्भ्रष्ट्ता अशापैकी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच अपघातापासून जपावे. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विवाहेच्छू युवक युवतीना विवाहयोग संभवतो. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** हटटी स्वभाव, मानापमान फार अशापैकी स्वाभाविक दोषांमुळे अकारण श्रम , दगदग होणे संभवते. त्यामुळे अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. शनी-राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येईल. तसेच आर्थिक समस्याही त्रस्त करतील. जपा. या राशीच्या काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर गैरसमजाने त्यात बाधा येणे शक्य आहे. जपा. रवि-बुध प्रतिकूल असल्याने शारीरिक-मानसिक आजार त्रस्त करतील. काहीना दु:ख - वियोग सहन करावा लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात परिस्थिती सुधारेल. बौद्धिक , शैक्षणिक, शास्त्रीय संशोधानात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळी नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कौतुकास पात्र ठरतील. मानसन्मान होणेही संभवते. असे असले तरी शनि ग्रहाच्या साडेसातीचा सात -आठ महिन्यांचा काळ असल्याने सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण

करणेच सुखाचे होईल. श्रद्धेने हनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात मन सतत शांत, स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करावा, हे उत्तम. आतताईपणाने आचरण झाल्यास असह्य मनस्तापच सहन करावा लागेल. जपा. स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबात कोणाचे दूर ठिकाणी स्थलांतर, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळींना सतत होणारे अपमानही सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. सहनशील बनून व संयमाने आचरण करून प्रतिकूल काळाशी मुकाबला करणेच इष्ट होईल. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उपासनेत मन रमविलेत तर खूपच सुखाचे होईल. गुरू-नेपच्यून शुभ योग आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल आहे. तसेच महिन्याच्या पूर्वार्धात शुक्रा मुळे थोडे कौटुंबिक सुख समाधान लाभेल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक -मानसिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना अपचन, पोटविकार यांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. अकारणअति विचार करू नका. बुद्धी व मन शांत ठेवा. नपेक्षा डोकेदुखी वा मेंदूचे आजार होणे शक्य आहे. जपा. गुरुकृपेने परिस्थिती आटोक्यात राहील. "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या व्ययस्थानी उच्च राशीचा शनी आणि राहू असल्याने मनस्ताप झाला तरी सुसह्य होईल. मात्र आर्थिक व्यवहार जपून व सावधानतेने करा. राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेहीसंभवते. लाभस्थानी शत्रु राशीचा मंगळ असल्यामुळे खूप कष्टपरिश्रामानेच अर्थलाभ होईल. काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. काही भाग्यवान मंडळींना

मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. जन्मकुंडलीत योग असेल तर काही भाग्यवान मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होण्याची शक्यता आहे. या राशीच्या शेतीवाडी असणाऱ्यामंडळीना शेतीवाडीपासून खूप लाभ होण्याची शक्यता आहे. पण घरगुतीबाबत घोटाळे, गैरसमज झाले नाहीत तरच कौटुंबिक सुख समाधान लाभेल. केवळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात संततिसुख लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक - मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल प्रगतिकारकव यश देणारा असा सिद्ध होईल. श्रद्धेने हनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज पठण करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत अध्यात्माची गोडी असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळवू शकाल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. रवि-हर्षल प्रतिकुल असल्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. पण बुध-शुक्रामुळे परिस्थितीत थोडा बदल होऊ शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्तापामुळे अनारोग्य होणे संभवते नोकरीत वरिष्ठांचा त्रास होणे संभवते. छुपे शत्रू त्रास देतील. प्रिय जनांपासून दुरावा होणेही शक्य आहे. त्यात भर म्हणून मुलांपैकीकोणाच्या आजारपणामुळे चिंतीत व्हाल. जपा. सहनशील बनून व मनावर संयम ठेवून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. स्वतंत्र व्यवसाय असेल तर त्यात खळबळजनक घटना घडणे संभवते. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. वकिली, सल्लागारी व्यवसायास काळ अनुकुल व लाभदायक होईल. राहूमुळे सहज

वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. गुरु ग्रहाच्या अनुकूलतेमुळे नवे स्नेहसंबंध, प्रेमसंबंध जुळतील. विवाहयोग संभवतो. श्रद्धा असेल तर “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ नियमित पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार आहे. पण वकिली - सल्लागारी व्यवसाय, खाण उद्योग, कोळसा व्यापारी आणि उच्च बौद्धिक व संशोधानात्मक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. परदेशगमनाचे योगही संभवतात. पण प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. जपा. कौटुंबिक सुख लाभेल. पण आर्थिक व्यवहार जपून करा. कोणाच्या आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. महिन्याचा अखेरचा सप्ताह या राशीच्या सर्वांनाच काही ना काही लाभ देऊन जाईल. महिन्याच्या उत्तरार ्धातविविध कारणांनी कौटुंबिक सुख आणि गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने सर्व प्रकारचे आरोग्य चांगले र ाहील महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुधाच्या अनुकुलतेने मित्रसुख व गृहसौख्य मिळण्याची शक्यता वाटते. या राशीच्या विद्यार्थीवर्गाल ाउत्तम आरोग्य राखता आले तरच शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. दाम्पत्यजीवनात दोघांचेही सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहिल्यासच अपेक ्षितसुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मानसिक स्थिती अतिशय कोमल झाली असावी असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहर ेनैराश्य येत असावे. पण शुक्राच्या अनुकुलतेने मनाविरुद्ध फारसे काही घडणार नाही. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण आप्तेष्ट भांडणे, व ाढताखर्च , फसवणूक, वित्तहानी अशापैकी कारणांनी त्रस्त

व्हाल,असे दिसते. जपा. आपल्या वाचेला लगाम घाला. अकारण काहीही बोलून इतरांना दुखवू नका. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कुटुंब सुख मिळून धनलाभ होणेही शक्य दिसते. गुरुच्या अनुकूलतेमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती व परीक्षेत उच्च यश मिळू शकेल. प्रेमसंबंधात वाढ होईल. परंतु राहूच्या प्रतिकूलतेमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. सहनशत्रुराशीतील अष्टम स्थानी असलेल्या मंगळामुळे काहीना उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. काहीना मूळव्याधीचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळीना अपघातामुळे हाडमोड सहन करावी लागेल. काही मंडळीना शारीरिक- मानसिक कष्ट मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. वीज व पाणी यांपासून धोका संभवतो. जपा. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात आपल्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेणे अगत्याचे होईल. रवि-मंगळ हे दोन्ही उष्ण ग्रह प्रतिकुल असल्यामुळे उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच असह्य मनस्तापामुळे रक्तदाब, हृदयविकार बबळावण्याची शक्यता वाटते. जपा. सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असेल तर या स्वभावदोषामुळे प्रिय जन अकारण दुखावले जातील. जपा. या राशीच्या लहान मुलांना त्यांच्या पालकांनी विशेष जपावे. कारण अशी मुले हूड व व्रात्य स्वभावाची असण्याची शक्यता वाटते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. भागीदारी व्यापार-व्यवसायात गैरसमजाने वा अन्य कारणाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. वैवाहिक जीवनातही मतभेद, वाद, न पटणे,

अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनस्थिती शांत व स्थिर राहील. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====oo0oo=====